सुवर्ण पारितोषिक
मिळालेला पोवाडा

# जय महाराष्ट्र

शाहीर
न.शे.पोहनेरकर



संपादक
गुं.फ.आजगांवकर



# जय महाराष्ट्र




लोकमान्य टिळक

**किंमत ५ रुपये**

मुद्रक : वि. ज. देसाई, वैभव प्रिंटिंग प्रेस, प्रार्थना समाज नाका,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.



संत ज्ञानेश्वर



संत तुकाराम

## सादर समर्पण—

स्वामी समर्थभक्त,
वैदिक धर्माचे अभिमानी,
महाराष्ट्र संस्कृती व मराठी वाणी
याबद्दल प्रेम बाळगणारे;
महाराष्ट्रांतील संत साहित्याचे
श्रद्धावान उपासक
आणि
महाराष्ट्राचे सन्मित्र—
आदरणीय श्री. कमलाकर ल. वालावलकर
यांस—

संपादक :
— गुं. फ. आजगांवकर



समर्थ रामदास




न्यायमूर्ती रानडे



शि. म. परांजपे काळकर्ते



आय. एन. ए. ची पहाणी
नेताजी सुभाषचंद्र बोस व सोबत
सेनापति भोसले, मागे राशबिहारी बोस



**गुं. फ. आजगांवकर**
सेनापती भोसले, यांचे चरित्र लेखक



राष्ट्रपति राजेंद्र प्रसाद व सेनापति भोसले



सरदार पटेल व सेनापति भोसले



नामदार गोखले



पं. नेहरू राष्ट्रिय शिस्तयोजनेची
पहाणी करीत आहेत सोबत से. भोसले

# जय महाराष्ट्र

( सुवर्ण-पदक मिळालेला )

बृहन्महाराष्ट्राचा ऐतिहासिक पोवाडा

: शाहीर :

न. शे. पोहनेरकर

साहित्यविशारद

प्रथम संस्करण : १९४७

द्वितीय संस्करण : १९९१

: संपादक व प्रकाशक :

गुं. फ. आजगांवकर

१७, के. जी. बी. निवास, गिरगांव, मॅजेस्टिकसमोर

मुंबई-४०० ००४.

# प्रास्ताविक —

"हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासामध्यें सर्वांत अत्यंत तेजस्वी असा जर कोणता कालखंड असेल तर आझाद हिंद फौजेच्या स्थापनेचा व पराक्रमाचा! अनंत काळपर्यंत भावी पिढ्यांना जिचें विस्मरण होणार नाहीं अशी ही भारतीय इतिहासामधली सोन्याची खाण आहे. असहकारितेच्या आणि कायदेभंगाच्या चळवळींत ज्यांनी भाग घेतला व तुरुंगवास पत्करला त्यांच्या सेवेचें महत्व आम्ही ओळखतों पण त्यांच्या सर्व त्यागाची व धैर्याची बेरीज केली तरी ती ब्रिटिशांच्या लष्करी शिस्तीविरूद्ध बंड करून स्वातंत्र्यासाठीं मृत्यूच्या गुहेमध्यें छाती-ठोकपणें पाउल टाकणाऱ्या आझादवीरांच्या हिमतीच्या आणि शौर्याच्या पासंगालासुद्धा पुरणार नाहीं."

—आचार्य अत्रे,

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत झांशीची राणी आणि तात्या टोपे यांनी आपल्या शौर्यानें जगाला स्तिमित केलें. महाराष्ट्राचें हें क्षात्रतेज कधीच लुप्त झालें नव्हतें. १९४३ साली, दुसऱ्या जागतिक युद्धांत सिंगापूरमधील फेरारपार्क मैदानांत हिंदी सैन्याची पुर्नघटना कोणी केली? हिंदुस्थानांत महात्मा गांधींनीं 'चलेजाव'चा लढा पुकारला तेव्हां ब्रिटिशांच्या लष्करी सामर्थ्याला ठिकठिकाणी भगदाडें पाडून त्यांना ज्यांनीं पळतां पळतां पुरे वाट केली त्या आझाद हिंद सेनेचे कर्णधार आणि मुख्य सेनापती जनरल जगन्नाथराव भोसले होते. त्यांचे सर्व शिक्षण इंग्लंडमधील सुप्रसिद्ध सँडहर्स्ट लष्करी कॉलेजांत झालें आहे. सिंगापूरचा पाडाव झाला तेव्हां ब्रिटिश सेनेंत ते 'कर्नल'च्या हुद्यावर होते. मे १९४६ च्या पहिल्या आठवड्यांत त्यांची लालकिल्ल्यातून सुटका झाली. कैदेतून सुटका होतांच आ. हिंद सैनिकांच्या पुनर्व्यवस्थेच्या प्रश्नाला त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें. त्यासाठीं महाराष्ट्रांतून त्यांनी दौरे काढले.

पुढें लोकनियुक्त मंत्रीमंडळें अधिकारावर आली; परंतु आ. हिं. सेनेचा चरितार्थाचा प्रश्न सुटला नाहीं. नंतर फाळणी झाली. हैदराबाद संस्थाननें स्वतंत्र आणि सार्वभौम राहण्याचा निर्धार जाहीर करतांच महाराष्ट्रावरील आगामी संकटाची त्यांना कल्पना आली. ११ मे १९४७ रोजीं पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत भाषण करतांना त्यांनी हिंद सरकार आणि जनता यांना जो इषारा दिला तो किती मोलाचा होता हें एक वर्षानंतर हिंद सरकारला पटलें. मे १९४७ च्या विविधवृत्तांतील त्यांची लेखमाला, ८-६-४७ च्या भारतज्योतींत २८-८-४७ च्या 'जय हिंद' मध्यें आणि ७-९-४७ च्या नवशक्तींत प्रसिद्ध झालेल्या मूलाखती त्यांच्या प्रामाणिक आणि देशहितेच्छु वृत्तीवर प्रकाश टाकतात. जगाच्या धकाधकींत मर्दच तरतात, षंढ नाहीं. यासाटीं महाराष्ट्रांतून एक लक्ष सेना उभी करण्याचा त्यांचा विचार होता; परंतु सरकारचा पाठिंबा त्यांना मिळूं शकला नाहीं. अशा स्थितींतहि लोकजागृतीचें कार्य त्यांनी चालूच ठेवलें होतें. यापैकीं एक भाग म्हणजे १५० रुपयांचें सुवर्णपारितोषक जाहीर करून महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट पोवाडा त्यांनी मिळविला.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे उजवे हात आणि आझाद हिंद सरकारचे चीफ् ऑफ् स्टाफ **सेनापति भोसले** यांचे लोकोत्तर कार्य आणि त्यांची देशभक्ती यांचे आज स्मरण होते. आझाद हिंद सेनेचे पुनर्वसन, पाकिस्तानच्या फाळणी-नंतर महाराष्ट्रांत आलेल्या निर्वासितांचे कल्याण नजिक उल्हास नगर येथें पुनर्वसन वगैरे कामें त्यांनी पूर्ण केलीं. स्वतंत्र भारतांतील तरूण पिढीला योग्य तें शिक्षण देऊन भारत एकात्म व बलाढ्य करण्यासाठीं **राष्ट्रीय शिस्त योजना** निर्माण करून देशभर त्यांनी एक तरूण पिढीची संघटणा निर्माण केली होती. तेथील कार्य पाहून पंतप्रधान शास्त्री, जनरल करीअप्पा, पंतप्रधान नंदा आणि अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी त्यांच्या कार्याची तारीफ केली होती. मे १९६३ मध्यें भोसले यांचे निधन झाल्यावर ही स्कीम गुंडाळून टाकण्यांत आली व देशांत आणि सरहद्दीवर फुटीर वृत्तीच्या लोकांना देशद्रोही कारवाया करण्यास वाव मिळाला. आज पंजाब, काश्मीर व आसाममधील जटील समस्याही स्वार्थी राजकारणी लोकांची देशाला देणगी होय.

— **गु. फ. आजगांवकर**

# प्रस्तावना

– न. र. फाटक

—×—

माझे मित्र श्री. **न. शे. पोहनेरकर** हे हैद्राबाद येथील वाङ्मय-सेवकांपैकीं एक प्रतिभाशाली कवि असून, महाराष्ट्राच्या इतिहासाचा व संस्कृतीचा अभिमान त्यांच्या प्रकृतीमध्यें इतका भिनलेला आहे कीं, महाराष्ट्राच्या जुन्या–नव्या घडामोडींचें ज्ञान त्यांच्या कवित्वांतून सहज स्त्रवूं लागतें. **जय महाराष्ट्र** ह्या त्यांच्या पोवाड्याला अगदीं वरवरच्या दृष्टिक्षेपानें पहाणारालाही श्री. पोहनेरकरांच्या ज्ञानासंबंधीं येथें केलेल्या विधानाचा साक्षात्कार होण्याला हरकत नाहीं. हिंदुस्थानाच्या गेल्या पांच सहाशें वर्षांच्या इतिहासांत महाराष्ट्राला निराळ्या मानाचें स्वतंत्र स्थान मिळावें अशी त्याची योग्यता असूनही दैवदुर्विलासानें या प्रांताला साधल्यास इतिहासांतून साफ बाजूला टकलावें आणि नाइलाजच झाला तर इतरांच्या इतिहासांतील सांधीकोंपऱ्यांत त्याला जागा द्यावी, असा प्रकार अलीकडे इतिहासाभ्यासाच्या क्षेत्रांत उत्पन्न झालेला दिसतो व त्याला अखिल भारतीय राष्ट्रीयत्वाच्या भ्रमांत गिरक्या मारणारे कित्येक महाराष्ट्रीयसुद्धां दुजोरा देणारे निघतात. असल्या स्वाभिमानाला खच्ची करूं पहाणाऱ्या उद्योगाला सफल न होऊं देण्याचा उपाय म्हणजे आपण काय आहोंत व कोण होतों याची खडान् खडा माहिती प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या दृढ परिचयांत आणून सोडणें हा होय. श्री. पोहनेरकराचा पोवाडा हा एक त्या उपायांपैकींच प्रभावी उपाय आहे. या पोवाड्याच्या अवलोकनानें महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व अर्वाचीन कर्तृत्वाचें वाचकाला समक्ष दर्शन घडल्याशिवाय रहात नाहीं. श्री. पोहनेरकरांच्या ज्ञानसंपन्न प्रतिभेनें महाराष्ट्राच्या धर्माची, संस्कृतीची, पराक्रमाची सर्व अंगोपांगें मोठ्या जोरदार कौशल्यानें या पोवाड्यांत एकत्र आणलेलीं असून, अलीकडे हैद्राबादी धामधुमीनें जीवनाचें स्थिरत्व नसलेल्या स्थितींतही त्यांनीं हा पोवाडा रचून, महाराष्ट्राच्या स्वाभिमानी वाङ्मयांत भर टाकली याबद्दल त्यांस द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील.

[ सेनापति भोंसले यांनी जाहीर केलेल्या अखिल महाराष्ट्र-पोवाडा स्पर्धेतील सुवर्ण पारितोषिकास पात्र ठरलेला सर्वोत्कृष्ट पोवाडा. ]

शाहीरः—**न. शे. पोहनेरकर**

साहित्यविशारद

**मराठी बाणा :**

अगस्तीला वंदायाला, गुरुदेवा नमायाला, वाकवीले गर्दनीला, मुनीराय स्वर्गा गेला, काळ अनंत लोटला, विचार सह्याद्रीनं केला, चाललें काय खोऱ्यांत ? खोऱ्यांत हो; दंडकाच्या पुण्यभूमींत ॥ जी ॥ हिमालयाला आव्हान, दिलें तेव्हां मी हिमतीनं, त्याची कांही तरी खूण, दिसते कां जिज्ञासेनं, पाही गर्दन उंचावून, डोळे गेले आसावून, दिक्कालालाही भेदून, दृष्टिपात जरासा केला, हा केला हो; काळाला घाम फूटला ॥ जी ॥ कालप्रवाह चालला, नवा महाराष्ट्र झाला. देव मराठा बनला, क्षत्रियांच्या कुलदेवाला, महाराष्ट्रात पूजायाला, परंपरा राखायाला, धन्यता सह्याद्रि मनीं, त्या मनीं हो, महाराष्ट्र विरुद अभिमानी ॥ जी ॥ घोष कोणाचा हा थोर, प्रतिष्ठान पालनहार, धनुष्याला सज्ज तीर, करी शंका हद्दपार, याच गोदा दरडीवर, डुले पताका सुंदर, चालली विजय घोषणा ! घोषणा रे, तूं धन्य शालिवाहना ॥ जी ॥ वाकाटकांनी वर्णीला, राष्ट्रकूटांनीं राखीला, चालुक्यांनीं चालवीला, पैठणांत पालवला, बदामीत बहरला, विदर्भांत विराजला, महाराष्ट्र मराठी बाणा, हा बाणा हो, काळाला देई आव्हाना ! ॥ जी ॥ माझ्या पत्थर हृदयांत, बालेघाटाच्या पोटांत, कला सुंदर कोरीत, माझे गोदातीरीं पूत, स्वर्गपृथ्वीशीं खेचीत, विश्वकर्मा थक्क होत, वेरूळ अजिंठा पाहात, पत्थर बोलूं लागला; लागला हो, शिल्पवेद साकारला ॥ जी ॥ देवगिरीमाजीं भले, यादव सम्राटांचे भाले, सुवर्ण गरुडध्वज डोले, भेरी मांदळ फुंकिले, अश्व खिंकाळती डौलें, चाल समशेरीच्या तालें, सुटली मराठी ललकारी; ललकारी हो, भले बाप यादव केसरी ॥ जी ॥

( चाल बदलून )

शरीरास चामडी नाही. माँसमय पाही, वीर हा कोण. शूर दारुण ॥ जी ॥ हरपाल सांगतो नाम. राखिला धर्म, मराठी बाणा, खरा मर्दाना ॥ जी ॥ ही हीच दिव्यपरंपरा, यादवेश्वरा, तपस्या साची, लाखमोलाची ॥ जी ॥

**धर्म कीं प्राण :**

( चाल बदलून )

यादवाचा गरुडध्वज विष्णुपदी विरमला ॥ जी ॥
हाःहाकार महाराष्ट्रात तेंव्हां उडाला ॥ जी ॥
यवनांनी आक्रमण केलें मराठ मोळ्याला ॥ जी ॥
सह्याद्री सिंहांना कठिण काळ पातला ॥ जी ॥
देवळांच्या मशिदी होत, राम तो अल्ला ॥ जी ॥
धर्म कीं प्राण हा सवाल सर्वत्रांला ॥ जी ॥

अबलांची अब्रू जाई, धर्मनावें हत्या होई, सारी झोटिंग पाच्छाई, शेंडी जानव्याला ग्वाही, मुंग्यापरी रगडावी, उसळला डोंब चहुंकडे; चहुंकडे हो, अल्ला अकबर कानी पडे ॥ जी ॥

( २ )

**संजीवनी स्वातंत्र्याची :**

धीर धरा धीर धरा, थोडा विचार हा करा, शक्तियुक्तीचा पसारा, नांदे श्रीमत त्या घरा. करुणा येइल ईश्वरा, प्रयत्नांची कास धरा, नेटके प्रपंची बना, आधीं बना हो, रघुवीर समर्थ म्हणा ! ॥ जी ॥ जिजाईच्या पदरांत, शिवशंकर खेळत, वाढे लाड कौतुकांत, ऐश्वर्याच्या आरामांत रामायण ते ऐकत, भारताला कान देत, अंतरांत आग भडकली, भडकली हो, कुर्निसाला मान ना लवली ॥ जी ॥

राज्यें निर्माण करावीं, बुद्धि अचाट असावी, रीत मराठी बरवी, बंडखोरी ती मोडावी, सवती दौलत थाटावी, परंपरा चालवावी, शिकवण ती बरवी, दादोजी कोंडदेवाची; देवाची हो, संजीवनी स्वातंत्र्याची ॥ जी ॥ तोरण मानाचें तोडितो, नारळ स्वातंत्र्या फोडितो, अफजुल्ल्याचा बळी देतो, तुळजा भवानी पूजितो, फाजलखाना फसवितो, शाहिस्त्याला शह देतो, दिलेऱ्याला दटावितो, शत्रूस्त्रियां सन्मानितो, रायगड राजधानींत, धानींत हो, मराठ्यांचा देव नांदत ॥ जी ॥ जांबेहून सुटला वारा, सूं सूं करी मावळखोरा, जाउनी थडके शिवनेरा, चेतवीतो घाट सारा, पेटे गोदेचा किनारा, दुस्मानाला नाही थारा, झंजावात महाराष्ट्रांत; राष्ट्रांत हो, शिवशाही अवतरे त्यांत ॥ जी ॥ हातावरी वार आला, ढाल उडाली ते बोला, धीर मुळीं न सुटला, शेला गुंडाळी हाताला, पट्टा पंजासुद्धां गेला, कोण बहाद्दर भला, थोटा हात मुजरा करी, हा करी हो; धन्य तान्हा करामत न्यारी ॥ जी ॥ माझ्या खोऱ्यांत राहात, पाणी गोदेचे पीतात, त्यांना हत्ती कःपदार्थ, पहा भागा नगरांत, आली पैजेवरी बात, कुतुबशाही दरबारांत, हत्तिची सोंड उतरितो, उतरितो हो, येसाजी कंक शोभतो ॥ जी ॥ वाऱ्यावरी कोण स्वार, हा तर बाजी फासलकर, बादशहाला उत्तर, 'घोडी स्वप्नीं न देणार, जीव जाई तों जपणार, नाहीं ठाऊक माघार, यशवंती माझी, मी तिचा, मी तिचा हो, फासलकरी फैसला साचा ॥ जी ॥ घोड-खिंडींत ठाकला, हात पट्ट्याचा चालला, शेतकापणी ती बोला, मळा स्वातंत्र्य पीकला, अवघा गदारोळ केला, भवानीच्या तांबुलासाठीं; यासाठीं हो, बाजी प्रभू वीर जगजेठी ॥ जी ॥

**वीराग्रणी :**

**( चाल बदलून )**

मस्तक नाहीं धडावरी, भरली शिरशिरी, चालला हात, शत्रु कापीत ॥ जी ॥
कबंधानें नाचतो तरी, वीर मुरहरी, प्यार राष्ट्राचा, माझ्या जीवाचा ॥ जी ॥
नेताजी पालकर छान, भाला रोखून, चालती वाट, स्वर्गीची नीट ॥ जी ॥

( चाल बदलून )

धर्मार्थ प्राण खैरात शत्रु हा करी ॥ जी ॥
शिवशाही कीर्तिचे कवच लेइली स्वारी ॥ जी ॥
तोडिले लचके शरिराचे तमा ना परी ॥ जी ॥
स्वातंत्र्य स्वराज्य ग्वाही मराठी खरी ॥ जी ॥
मरुनिहि न हटती बिरुद बांधिले करीं ॥ जी ॥
पुत्राचें हंसत बलीदान राष्ट्राला करी ॥ जी ॥
खंडोबल्लाळाची स्वामिभक्ति ही पुरी ॥ जी ॥
संसार संपदा त्यागी; वीर केसरी ॥ जी ॥

( चाल पहिली )

संभाजीची पट्टराणी, घात होतां फितुरांनीं, शत्रू गोटांत राहूनी, शाहूबाळा जोपासूनी, धैर्यवान बनवोनी, जिजाईची सून शोभते, शोभते हो, शिवर्याची शिवाई येथें ॥ जी ॥

( ३ )

राज्य सारें लया गेले, शत्रु चौफेर उठले, शंभुराय स्वर्गी गेले, वीर वर गोळा केले, प्याद्यांतून फर्जी आले, महाराष्ट्रीं नाचवीले, पाणी दुस्माना पाजिलें, शाबास अमात्य पंता, श्रीमंतारे, आज्ञापत्रें राष्ट्रीय संथा ॥ जी ॥

भारताचा अवतार, महाराष्ट्रीं खरोखर, जिजी लढविती बहाद्दर, नाहीं सौख्याची कदर, चालो देशाचा संसार, शिवशाही कारभार, पुण्याई लाख मोलाची, मोलाची हो, छत्रपती राजारामाची ॥ जी ॥ धनसिंग जाधवराव, दरबारीं ज्याचं नांव, खुल्या जिभेनं बोलावं, तरवारीनं तें तोलावं, नाहीं विश्रांतीला ठाव, शाबास जाधववीरा, तूं वीरा रे, महाराष्ट्र पुत्र तूं खरा ! ॥ जी ॥ खाड खाड टाप येई, कोण स्वार हा सवाई, थरथरे घाट पाही, भगवा झेंडा डौल घेई, अभिमानानें तो पाही, चालली पहा मर्दाची, मर्दाची हो, घोडदौड संताजीची ॥ जी ॥ नांव शूराचें सांगते, सून शिवबाची म्हणते,

शाहूलागी आव्हानीते, राज्यभार सांवरिते, नामवंता नाचविते, सवता संसार थाटिते, मराठ्यांची कुलस्वामिनी, स्वामिनी हो, ताराबाई धन्य महाराणी ॥ जी ॥ शाहू अति भाग्यशाली, फिरल्या दिल्लीकडे ढाली, घोडदौड सुरू झाली, बुंदेलखंड साद घाली, उत्तरेच्या हालचाली, गजेंद्रार्थ वनमाली, बाजीराव झेप घाली. हुरड्याचे घास फाकितो, फाकितो हो, ब्राह्मण खरा साजतो ॥ जी ॥ खड्या फौजेनिशी जाई, वसईला टक्कर देई, अप्पा चिमाजीची घाई, जवानमर्द ब्राह्मणभाई, उडालीसे टिपरघाई, सर जंजिरा तो होई, धन्यता मना वाटली, वाटली जरी, नऊ लाख बांगडी फुटली ॥ जी ॥

भाउ निघे उदगीराला, यश आख्या महाराष्ट्राला, हरहर गाजविला, भीमथडी तो उडाला, सिंधू नदा पाणी प्याला, भगवा झेंडा तो अटकेला, साट कोस छावणी करी; हा करी हो, बाजीपुत्र राघूभरारी ॥ जी ॥

(चाल बदलून)

मल्हारराव होळकर आले, दमाजी भले. राणोजी बाबा, शत्रु करी तोबा ॥ जी ॥ रोहिलखंड काबिज केला, कळस चढविला, माझ्या जीवाला, आनंद झाला ॥ जी ॥ 'बचेंगे तो लढेंगे' म्हणे, कुंजपुरी जाणे, मराठी हात, दाविला सत्य ॥ जी ॥

फुलांची माला :

(चाल बदलून)

पानसे दादा तोफांची सलामी देतो ॥ जी ॥
आंगऱ्याची करामत दर्याला नाचवितो ॥ जी ॥
जनकोजी मराठा वीर मान लववितो ॥ जी ॥
रणशय्या भाउची रक्तानं रंगवितो ॥ जी ॥
विश्वास हत्तिवर श्वास शेवटीं घेतो ॥ जी ॥
भा . चा मर्दानी थाट जगा दावितो ॥ जी ॥
दोन मोतीं हारपले, मोहरे सत्तावीस गेले, रुपये अमित बुडाले, खुर्दा मोजितां थकले, राज्यभांडार लूटले, पानिपती पावन झाले, महाराष्ट्र–माय–पूजेला, पूजेला हो, तीन लाख फुलांची माला ॥ जी ॥

( ४ )

विश्वासाचा अंत झाला. माधवराव पुढें झाला. भारी कदर त्याची बोला. आव्हानितो हैदरला, सज्ज पटवर्धनी भाला, तुंगभद्रेच्या खोऱ्याला, कलता कळस सांवरिला, रामेश्वरी पूजा बांधितो, बांधितो हो, स्वातंत्र्यसेतु सांधितो ॥ जी ॥ कोणाचा हा नूर थोर, दिसे सद्दी जोरदार, भासे श्रीकृष्ण अवतार, वय कोंवळें हो फार, रंगपचमी दरबार, झोक मराठ्यांचा न्यार, पाटील बाबा तोलदार, फडनिसांचा कारभार, स्वातंत्र्याचे शिलेदार, सजविल्या फिरंगी फौजा, त्या फौजा हो, अल्पायुषी सवाई सरजा ॥ जी ॥ काशीपासून रामेश्वर, तीर्थयात्रेचा विस्तार, देवळांचा जीर्णोद्धार, अन्नछत्रांचा संसार, दानधर्माचा प्रसार, ईशसेवेशीं तत्पर, राजकारणीं चतुर, पुण्यश्लोक कारभार, आदर्श सती गाजली, गाजली हो, होळकरीण अहिल्या भली ॥ जी ॥ बोकीलांचे शब्द खोल, विठ्ठल सुदरांचा ताल, चोरघड्यांची मैफिल, बुद्धिबळ खेळ, सैल समशेरीचे मल सदा मर्दान्यांचा कौल, मानासाठी सर्वस्वपणा, तें पणा हो, मराठ्यांचा मुत्सद्दी बाणा ॥ जी ॥ साम्राज्याचा सारीपाट, ज्याचा मर्दुमकीचा थाट, मोहरा चालावा तो नीट, नाहीं अंतरी कपट, बुद्धिभावना चोखट, खटनटाशी बहु खट, हाडपेर बालेघाट, पोलादाचें मनगट, रक्ताची रंगपंचमी, पंचमी हो, मराठ्यांची कीर्ति लई नामी ॥ जी ॥ शेवटचा सेनापती, बापू गोखल्याची ख्याती, धनी पाठीशीं ठेविती, महाराष्ट्रांत फिरती, खडकीला धडका देती, टोपीवाले हाय खाती, स्वातंत्र्याची पूर्णाहूती, रणांगणीं शांत परि होई, तो होई हो, इतिहास संपला नाहीं ॥ जी ॥

**१८५७ साल :**

शिवशाही तीं संपली, पेशवाई लया गेली, आंगलाई पुढें आली, मराठ्यानें न्याहाळली, आंगीं शिरशिरी भरली, डोळ्यामध्यें लाली आली, अठराशें सत्तावन येतो, हा येतो हो, तात्या टोपे टोपी उडवितो ॥ जी ॥ हयू रोजाला पाजी पाणी, झांशीवाली ती मर्दानी, फेटा मर्दानी बांधुनी, तंग सुरवार चढओनी, टांच घोड्याला देऊनी, बुरजाहुनी फेकिते घोडा, हा घोडा हो,

इतिहास जाहला वेडा ॥ जी ॥ मराठ्यांचे मानी धनी, पेशव्यांचे छावे दोन्ही, नानाराव साहेब मानी, संगं लक्ष्मी ती मर्दानी, ताल्या टोपे तो सेनानी, सत्तावन साल गाजलें, गाजलें हो, दिल्लीला जाऊन थडकलें ॥ जी ॥

(चाल बदलून)

सत्तावनीं होय सत्यानाश, बसे गळफांस, आंग्ल सत्तेचा; सार्वभौमाचा ॥ जी ॥
धुमसती आग कधि शांत, राहिना स्वस्थ, पेट ती घेई, धडधडे पाही ॥ जी ॥
क्रांतीचा झोत झगझगला, धीर सूटला, आंग्ल सत्तेला चैन ना बोला ॥ जी ॥

(चाल बदलून)

फडक्यांनी महाराष्ट्राची निशा उडविली ॥ जी ॥
चाफेकर बंधूंनी क्रांतिसाद घातली ॥ जी ॥
साहेबांना यमसदनाची वाट दाविली ॥ जी ॥
महाराष्ट्र मरे, नच वांके द्वाही फिरविली ॥ जी ॥
सह्याद्री खोऱ्याला वांझकळा ना आली ॥ जी ॥

(चाल पहिली)

लेखणीचा आला काळ, चाले बुद्धिबळ खेळ, तंग घोड्याचा तो सैल, समशेरी-लागी सळ, घेती शांततेचा कौल, आंग्ल वारूणीची भूल, दाटली निशा डोळयांत, डोळयांत हो, मराठ्यांच्या शूर हृदयांत ॥ जी ॥

( ६ )

**आव्हान आंग्लेसत्तेला :**

मराठ्यांचा इतिहास, सांगे पुन्हा मराठ्यास, चैन नाही त्या जीवास, थंडगोळा होई देश, त्याला ऊब आणायास, देई कर्तव्य आदेश, धर्मसमाज कार्यास, नवें स्वरूप देण्यास, महादेव गोविंद येई, तो येई हो, महाराष्ट्र सद्‌गुरू पाही ॥ जी ॥ लोकहितवादी भले, बाबा जोतीराव फुले, शिग तयांनी

फुंकिलें, आघाडीचे वीर झाले, सत्य शोधाया सजले, देशोद्धारा सज्ज झाले, समाजाला हालवीलें, सुधारणा फुंकिती कानीं, ती कानीं हो, मराठ्यांच्या मूक जीवनीं ॥ जी ॥ हाती घेतली लेखणी, दिलें पोलादाचें पाणी, लेख लिहितो रक्तांनी, घुमे दऱ्याखोऱ्यांतुनी, मराठ्यांच्या मनांतुनी, निबंधांच्या मालेतुनी, हाकारितो नव्या दुनियेला, दुनियेला हो, मराठीचा शिवाजी भला ॥ जी ॥ हिंदी अशांतिचा जनक, बुद्धिबलाची चमक, बांधी विरूद्द रोखठोक, स्वातंत्र्याची देई हाक, 'माझा जन्मसिद्ध हक,' नाहीं मागणार भीक, आव्हान आंग्लसत्तेला, सत्तेला हो, महाराष्ट्र–तिलक शोभला ॥ जी ॥ समाजाची सुधारणा, ध्यास एकची ज्या मना, करी केसरी गर्जना, सुधारक थोर जाणा, बोले तैसा चाले बाणा, तळमळ ती जाईना डोंगरीचा जो पाहुणा, मानकरी अग्रपूजेचा, पूजेचा हो, आगरकर 'सुधारक' साचा ॥ जी ॥ बुद्धिमत्ता ती विशाल, मार्ग दाविला निर्मळ, सनदशीर चळवळ, अंतरांत तळमळ, भारताचा भाग्यकाळ, डोळे पाहती आशाळ, आंग्ल भाषा भरिते पाणी, ती पाणी हो, नामदार गोखले मानी ॥ जी ॥

**कारागारातून :**

कारागाराला भेदून, सुटे मुलूख मैदान, पुन्हा पहा ही कुठून, आग शब्दाशब्दांतून, ज्वाला लेखणीमधुन, हिंदुत्वाला जागवून, सप्तद्विप ओलांडून, काळ्या पाण्याच्या मधून, क्रांतीचा अमृत प्याला, हा प्याला हो, **विनायक** घेउनी आला ॥ जी ॥ बांधूं मुळशीला धरण, करूं धनवंता कुरण, पोटें दीनांची मारून, सरकाराला चुचकारून, डाव टाकियेला छान, सेनापती गर्जना करी, ती करी हो, बापटांची सुटे ललकारी ॥ जी ॥

**१९४२ साल :**

देई प्रेमाचा संदेश, संस्कृतीचा आदेश, प्रीत–जीवन जगण्यास, लेखणीची धार ज्याम, चाले कुंचल्यापरीस, मराठीचा मानी मोहरा हो, सानेगुरुजी

वारकरी खरा ॥ जी ॥ अच्युतभाई पुढें आले, महाराष्ट्र क्रांतीवाले, सरकारला आव्हानीलें, शिंग युद्धाचें फुंकिलें, अधिकाऱ्यां पटविलें, पाणी मराटी दाखविलें, गाजलें बेचाळीस साल, तें साल हो, पटवर्धन रत्न बहुमोल ॥ जी ॥ आलें बेचाळीस साल, गेला सत्तेचाही तोल, अत्याचारांचा तो काळ, त्रस्त जनता सकळ, केली सशस्त्र चळवळ, दिलें उत्तर प्रबळ स्थापुनी नवे सरकार, सरकार हो, नानापाटील भले बहादूर ॥ जी ॥

( चाल बदलून )

भवानीची नित्य उपासना, जयाचा बाणा, शांतिमय क्रांति, पटेना चित्ती ॥ जी ॥ रक्ताची रंगपंचमी, हौस ज्या नामी, पटेना त्याला, अहिंसा बोला ॥ जी ॥ शत्रूची मस्ति जिरवावी, आस बरवी, सदाचा ध्यास, हाच हव्यास ॥ जी ॥

चाल बदलून

'जयहिन्द' गर्जना नेताजींनीं केली ॥ जी ॥
'चलो दिल्ली' साद ही हृदय थरारुनि गेली ॥ जी ॥
सह्याद्रि सिहानं आयाळ पिंजारली ॥ जी ॥
अंगांत जोमाची लहर सणाणुनि गेली ॥ जी ॥
पूर्वीचा भव्य इतिहास, पानें फडफडली ॥ जी ॥
आपोआप समशेरी वरी मूठ ती चढली ॥ जी ॥

हवे राष्ट्राला बलिदान :—

( चाल पहिली )

**हवें राष्ट्राला बलिदान । मागा शीर उतरून । सज्ज मराठ्याचं मन । शंभरी शंभराचं दान । हीच नीति त्याची जाण । जन्मस्वभाव ठेवण । जगन्नाथराव घे उडी । ती उडी हो । भोसल्यांची मर्दुमी खडी ॥ जी ॥**

( ७ )

ज्ञानेशाची ज्ञानेश्वरी, पैठणची कला न्यारी, देहू आळंदी माझारी, दासो पंतांची उजरी, पंडितांची कामगिरी, शाहिरांची बाजीगिरी, मराठीचे वारकरी, अमृताशी पैजा मारी, भारताची शिलेदारी, मानाची मिरास तुला, ही तुला हो, यावश्चंद्र दिवाकर बोला ॥ जी ॥ जातीभेद नाही येथ, उच्चनीचतेची बात, एक सर्वांचाची हेत, मराठा मी महाराष्ट्रांत, मराठीची सेवा सत्य, साधूं स्वराज्य निश्चित, स्वातंत्र्याची तळी उचलावी, उचलावी हो, भवानीची पूजा बांधावी ॥ जी ॥ भूतकाळाच्या पोटांत, तुझा पराक्रम सत्य, जग आश्चर्यें पहात, वर्तमानाची ना खंत, भविष्याची काय बात, भाग्याची ललाटरेखा, ती रेखा हो, काळाला अटळ कीं देखा ॥ जी ॥ ऐक महाराष्ट्र वीरा, भारताच्या राजेश्वरा, नोक झोक तुझा न्यारा, मर्दुमीचा साज सारा, गोदा कृष्णेचा किनारा, तुंगभद्रेचा आसरा, पराक्रमाचा पसारा, गाजतो यशस्वी डंका, हा डंका हो, उरली न कुणाला शंका ॥ जी ॥ उत्तरेला राजपूत, तुझें जातगोत सत्य, देई शीखभाई हात, खडा गुरखा पाचारित, काशी रामेश्वरी ख्यात, अटकेला मारी लाथ, सुरतेची बेसूरत, कलकत्त्याच्या काळजांत, इतिहास तुझा गाजला, गाजला रे, अभिमान माझ्या जीवाला ॥ जी ॥ आली आज पुन्हा वेळ, करी ब्रह्मांड कवळ, एक आकाशी पाताळ, तुझ्या हातींचा तो मळ, झाड खांदीची कांबळ, घाली अंबेचा गोंधळ, भंडारा फास भैरवा, भैरवा रे, दुस्मान धाडी रौरवा ॥ जी ॥

( चाल बदलून )

अखंडाचे खंड जाहले, डोळे उघडले, दावी नेटुनी, मराठी पाणी ॥ जी ॥
दुस्मान साधितो डाव, तया पटवावं, मराठा मेला, अजुनि ना बोला ॥ जी ॥
लाडावले पाहुणे परी, मालकावरी, झाडिती लाथा, सज्ज ते घाता ॥ जी ॥

भारताचें भाग्य महाराष्ट्रा तुवां घडवावें ॥ जी ॥
विंध्याद्रि तुंगेच्या तीरी झेंड लावावे ॥ जी ॥
चौभंग महाराष्ट्राला एक बनवावें ॥ जी ॥
भारताचा तूंच शिलेदार जगा दावावें ॥ जी ॥
मोडेन परी वांकेना, ठाण मांडावें ॥ जी ॥
खंडप्राय मायभू अखंडपण सांधावें ॥ जी ॥
तुजकडे आशेनें भारतभूमी पाहे ॥ जी ॥

**( चाल पहिली )**

पाजी दुस्मानाला पाणी, ऐके मर्दुमीची गाणी, हांक देई शाहिरवाणी, उभी माय तुळजाराणी, पुकारीते भक्त मानी, साह्य रामवरदानी, उदो, उदो, अंबाबाईचा, बाईचा हो, **भोसले रविशाहीचा ॥ जी ॥ महाराष्ट्र भाग्यलक्ष्मीचा ॥ जी ॥**

---

## व्यक्ति परिचय —

**— नरहर शेषराव पोहनेरकर**
साहित्यविशारद

ठराविक चाकोरीचा अवलंब न करतां, ध्येयाचा साक्षात्कार होतांच आपल्या व्यक्तिमत्वाचा फुलोर फुलविणाऱ्या कांहीं व्यक्ति असतात. समाजांतील रूढ मूल्यांनीं अनेक गोष्टींची वाण त्यांना असली तरी त्यांची खंत त्यांना नसते. अशाच 'आत्मक्रीड–आत्मरतिः' मध्यें मग्न असणारांपैकीं श्री. पोहनेरकर आहेत.

श्री. पोहनेरकराचा जन्म शके १८१९ मध्ये परळी ( वैजनाथ ) येथे झाला. प्राथमिक शिक्षण आंब जोगाईस झालें. पुढील शिक्षणासाठी त्यांनी विवेक वर्धिनी पाठशाला ( हैदराबाद द. ) मध्ये प्रवेश केला. याचवेळीं त्यांना आपल्या ध्येयाचीं गोड स्वप्नें पडूं लागलीं. मराठीच्या अभ्यासाकडे त्यांचें मन धावूं लागलें. 'मराठी ग्रंथसंग्रहालयांत' ते रमूं लागले. त्या नादांत शिक्षणाची ठराविक चाकोरी केव्हांच सुटली. मॅट्रिकचा टिळा त्यांना लागला नाहीं. पदवी

परीक्षेच्या मानदंडानें व्यक्तीच्या विद्वत्तेचें, कर्तृत्वाचें व योग्यतेचें मूल्यमापन करणारांची नेहमींसाठीं त्यांनीं निराशा केली.

सरकारी नोकरी, एंजिन ड्रायव्हर इत्यादि अनेक वाटा त्यांनीं चोखाळल्या. पण या विषयांत रमणारा त्यांचा पिंडच नव्हता. बेदरांतील नारायण खेड तालुक्यांत त्यांनीं 'अनंत विद्यालय–शांति सदन' नांवाची संस्था स्थापन केली. श्रमसातत्यानें पुष्कळ वर्षे ती चालविली आणि पुढें चालविणारी यशस्वी परंपरा निर्माण केली. स्वत्व, स्वधर्म, स्वभाषा आणि स्वदेश याविषयीं स्वाभिमान निर्माण करणारें शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावें हें आपलें रम्योदात्त स्वप्न या संस्थेच्या रूपानें त्यांनी साकारलें.


'डॉ. डावरे प्राथमिक शाळा' ही विवेकवर्धिनी शिक्षण संस्थेची शाखा जेव्हां उघडण्यांत आली तेव्हां मुख्याध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. अनेक वर्षें हें कार्य त्यांनी अत्यंत यशस्वीपणें केलें. सध्या ते केशवस्मारक आर्य-विद्यालयांत मराठीचे अध्यापक आहेत. ( १९४७ )

गद्य आणि पद्य या दोन्ही प्रकारांत त्यांची लेखणी अप्रतिहत चालते. 'बागशाही' नांवाचा त्यांचा लहानसा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या-जवळचा महत्वाचा ठेवा म्हणजे पोवाड्यांचा. कदाचित् जुन्या मराठी वाङ्मयाचा अभ्यास, इतिहासाची आवड, आणि पूर्व दिव्यांचे आकर्षण यांनीं बनलेल्या मनःपिंडाचा आविष्कार याच माध्यमांतून अधिक प्रभावितपणें होत असावा. त्यांची भाषा शिक्षित वर्गाला मोहिनी घालणारी आहे. भावपूर्ण रचना, संयमित विचारसरणी, नादमधुर भाषेची जडण घडण, आणि ओजस्वी भावनांचा मधुर संगम त्यांचा लिखाणीत निश्चित सांपडेल.

गेल्या अर्ध्या तपापासून 'मराठी मंडळ' नांवाची संस्था त्यांनी हैदराबादेस चालविली आहे. बीड, परळी इत्यादि ठिकाणांहून त्यांनीं मिळविलेली ऐतिहासिक साधनें फार मोलाचीं आहेत. प्रकाशनाच्या प्रतिकूलतेमुळे श्री. पोहनेरकरांच्या कार्याची यथार्थ कल्पना देणें अशक्य वाटतें.

—भालचंद्र कहाळेकर

# जय महाराष्ट्र



झांशीची राणी